follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

* RNI Regd. No. 72105/99 | * वर्ष २५, अंक १९२ | सातारा, बुधवार, २० मार्च, २०२४ | * पाने ८ (सुप्रभात) | किंमत रू ५/-

# भाजपकडून मनसेला

## महायुतीच्या चिन्हावर लढण्याची अट

### अमित ठाकरे दक्षिण मध्य मुंबईतून लोकसभेच्या रिंगणात?

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे आणि भाजपचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते अमित शाह यांनी मंगळवारी दिल्लीत भेट झाली होती. या भेटीत बंद दाराआड मनसे-भाजप युतीबाबत चर्चा झाली. या भेटीनंतर राज ठाकरे आणि त्यांचे पुत्र अमित ठाकरे हे मुंबईत परतले. मात्र, अमित शाह आणि राज ठाकरे यांच्यात झालेल्या चर्चेचा नेमका तपशील समोर येऊ शकला नव्हता. परंतु, महायुती मनसेसाठी लोकसभेच्या एक ते दोन जागा सोडू शकते, अशी चर्चा सुरु झाली होती. दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई किंवा शिर्डी लोकसभा मतदारसंघ यापैकी दोन मतदारसंघातून मनसेचा उमेदवार लोकसभेच्या रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु, मनसेच्या उमेदवाराने रेल्वे इंजिन या चिन्हावर नव्हे तर महायुतीमधील भाजप, शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेस या तीनपैकी एका पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी,



अशी अट राज ठाकरे यांना घालण्यात आल्याचे समजते. याबाबतचा निर्णय घेण्यासाठी मनसेला फक्त एका दिवसाचा अवधी देण्यात आला आहे.

शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांनी एबीपी माझाच्या झीरो अवर या कार्यक्रमात बोलताना याबाबत माहिती दिली. दीपक केसरकर यांनी म्हटले की, राज ठाकरे हे मनसेच्या रेल्वे इंजिन या चिन्हावर लढण्यासाठी आग्रही होते. परंतु, त्यांनी महायुतीमधील एखाद्या पक्षाचे चिन्ह घ्यावे, असा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. कारण या तीन पक्षांचे चिन्ह लोकांना माहिती झाले आहे. आम्ही या चिन्हांचा प्रचारही केला आहे. पण अंतिम निर्णय हा अमित शाह यांनीच घ्यायचा आहे. अमित शाह आणि राज ठाकरे यांच्यात नेमकं काय ठरलंय, हे मला माहिती नाही, असे दीपक केसरकर यांनी म्हटले.

राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाच्या महायुतीतील समावेशाबाबत लवकरच गोड बातमी मिळू शकते. अद्याप महायुतीचे जागावाटप निश्चित व्हायचे आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या मनसेसाठी जागा सोडल्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपच्या वाट्याला किती जागा येणार, हे ठरवावे लागेल, असे दीपक केसरकर यांनी म्हटले.

राज ठाकरे आणि अमित शाह यांच्या भेटीनंतर भाजपकडून मनसेसाठी लोकसभेच्या दोन जागा सोडल्या जातील, अशी चर्चा आहे. दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई किंवा शिर्डी लोकसभा मतदारसंघापैकी दोन जागा मनसेच्या वाट्याल येऊ शकतात. यापैकी शिर्डी लोकसभेच्या जागेवरुन मनसेचे माजी आमदार बाळा नांदगावकर लोकसभेच्या रिंगणात उतरु शकतात. तर दक्षिण मुंबई किंवा दक्षिण मध्य मुंबईतून राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना लोकसभेची उमेदवारी मिळू शकते, अशी शक्यता काही राजकीय जाणकारांनी बोलून दाखवली आहे. तसे घडल्यास अमित ठाकरे हे आदित्य ठाकरे यांच्यानंतर निवडणूक लढवणारी ठाकरे घराण्यातील दुसरी व्यक्ती ठरतील.

## पुणे लोकसभा निवडणूक शरद पवार यांनी लढवावी

### कार्यकर्त्यांची आग्रही मागणी

**पुणे:**पुण्यातील लोकसभा जागेसाठी भाजपने माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारीही जाहीर केली. त्यांनी निवडणुकीचा प्राचारही सुरू केला आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण राहणार, याबाबत अनेक नावे समोर येत आहेत. महाविकास आघाडीत ही जागा काँग्रेसच्या वाट्याला आहे. येथून मीच निवडणुकीच्या रिंगणात उतरावे, अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी केल्याची माहिती खुद्द राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

पुणे, माढा, साताऱ्यातून लोकसभा निवडणूक लढविण्याचा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. पण आतापर्यंत मी १४ निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या आहेत. मात्र आता निवडणूक लढविणार नसल्याचे या आधीच जाहीर केलेले आहे. शरद पवार हे मंगळवारी मोदीबाग येथील निवासस्थानी होते. त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते त्यांना भेटले आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीबाबतही चर्चा झालेली आहे. ठाकरे गटाच्या प्रवक्ता व उपनेत्या सुषमा अंधारे, शिवसंग्राम पक्षाच्या प्रमुख ज्योती मेटे यांनीही शरद पवार यांची भेट घेतली आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून पंकजा मुंडे या लढणार आहेत. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवाराचा शोध सुरू आहे. त्या ठिकाणहून अनेक इच्छूक आहेत. त्यात शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या व स्वर्गीय विनायक मेटे यांची पत्नी ज्योती मेटे या ठिकाणहून निवडणूक लढण्यासाठी इच्छूक आहेत. त्यांनी आज पुण्यात शरद पवार यांची भेट घेऊन निवडणूक लढविण्याबाबत इच्छा व्यक्त केली आहे. परंतु शरद पवारांनी यावर अद्याप निर्णय दिलेला नाही. तसेच मागच्या वेळी प्रितम मुंडेविरुद्ध मैदानात उतरलेले बजरंग सोनवणे हे पुन्हा एकदा लढण्याची तयारी करत आहेत. ते सध्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर आहे. परंतु ते शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याचा बोलले जात आहे.

## शरद पवार गटाला दिलासा

### लोकसभा निवडणुकीपर्यंत तुतारी वापरता येणार; सुप्रीम कोर्टाचे आदेश

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील शरद पवार गट आणि अजित पवार गटामध्ये पक्षाचे नाव आणि चिन्हासाठी सुरु असलेल्या कायदेशीर लढाईत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निर्देश दिले. शरद पवार गटाला राज्यसभा निवडणुकीसाठी मतुतारी वाजवणारा माणूसफ हे पक्षचिन्ह देण्यात आले होते. परंतु, राज्यसभेची निवडणूक झाल्यानंतर शरद पवार गटाला हे चिन्ह मिळू नये, यासाठी प्रयत्न सुरु झाले. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी शरद पवार गटाला मोठा दिलासा दिला. त्यानुसार आता शरद पवार गटाला लोकसभा निवडणूक होईपर्यंत मतुतारीफ हे चिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे पक्षाचे नाव वापरता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगालाही निर्देश दिले आहेत. लोकसभा निवडणूक होईपर्यंत तुतारी हे चिन्ह कोणालाही देऊ नये. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाची नोंदणी करण्यात यावी, असेही न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे.

अजित पवार यांना देण्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हे चिन्ह गोठवावे, अशी मागणी शरद पवार गटाकडून करण्यात आली होती. अजित पवार यांना घड्याळ हे चिन्ह दिल्यास ग्रामीण भागातील मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. त्यामुळे तुर्तास अजित पवार यांना घड्याळ हे चिन्ह देऊ नये, अशी मागणी शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे कायम ठेवले. मात्र, या खटल्याच्या अंतिम निकालानुसार या निर्णयात बदल होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्याकडेच राहील, याबाबत शाश्वती नाही, असे संकेत सर्वोच्च न्यायालयाने दिले.



## खाद्यतेलाचे दर पुन्हा भडकले

### एप्रिलमध्ये दर कमी होण्याची शक्यता


**नागपूर :** केंद्र सरकारने खाद्यतेलाच्या आयातशुल्कात गेल्यावर्षी कपात केली. ही कपात मार्च-२०२५ पर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतरही देशात खाद्यतेलाचे दर कमी होण्याऐवजी १५ दिवसांपासून भडकले आहेत. सर्व खाद्यतेलात प्रतिकिलो १० ते १५ रुपयांची वाढ झाल्याने स्वयंपाकघरातील फोडणी महागली आहे.

होळी आणि रमजान महिन्यामुळे पाम तेलाचे दर मलेशिया देशातच महाग झाले आहेत. रमजान ईद साजरी होईपर्यंत दर कमी होण्याची शक्यता नाहीच. ते एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात कमी होतील. पाम तेलाच्या दरवाढीचा परिणाम सर्व तेलाच्या दरवाढीवर झाल्याने लोकांना सध्यातरी जास्त दरातच खाद्यतेल खरेदी करावे लागेल, अशी शक्यता इतवारीतील खाद्यतेल विक्रेते यांनी व्यक्त केली.

भारतात पाम तेलाची सर्वाधिक आयात होते. सध्या रमजान महिना असल्याने जगभरातील मुस्लीम देश मलेशियातून पाम तेलाची मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत. त्यामुळे पाम तेलाचे दर जागतिक स्तरावर वधारले आहेत. या तेलामुळे अन्य खाद्यतेलाचे दरही वाढले आहेत. गेल्या १५ दिवसांपासून दरवाढ सुरू असून मार्च अखेरपर्यंत राहील. त्यानंतर अर्थात एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात मलेशियात दर कमी होताच भारतातही खाद्यतेलाचे दर कमी होण्याची शक्यता असल्याचे अनिल अग्रवाल यांनी सांगितले.

आयात शुल्क कपातीचा तेलबियाच्या बाजारावर परिणाम

केंद्र सरकारने निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन मार्च १५ रोजी अधिसूचना काढल्याने मार्च २०२५ पर्यंत कच्चे सोयातेल, पामतेल आणि सूर्यफुल तेलावर ५.५० टक्के आणि रिफाईंड तेलावर १३.७५ टक्के आयातशुल्क राहणार आहे. मागील हंगामात याच पातळीवर आयातशुल्क होते. त्यामुळे विक्रमी १६५ लाख टन खाद्यतेलाची आयात झाली होती. आयात वाढल्याचा दबाव देशातील तेलाच्या भावावर झाला. पुढे असेच निर्णय होत राहिल्यास देशातील शेतकरी तेलबिया उत्पादनापासून परावृत्त होऊ शकतात. ही देशासाठी चिंतेची बाब होऊ शकते, असे तेल बाजारातील अभ्यासकांचे मत आहे. भारतात पाम तेलाची आयात इंडोनेशिया, मलेशिया आणि थायलंडमधून होते. सोयातेलाची आयात अर्जेंटिना आणि ब्राझीलमधून, सूर्यफुल तेल रशिया आणि युक्रेन देशातून होते.



## किल्ले शिवनेरी गडावर २१ मार्चपासून प्लास्टिक बंदी

**नारायणगाव :** किल्ले शिवनेरी गडावरील जैवविविधता अबाधित रहावी व येणाऱ्या पर्यटकांना ते वैभव पाहून किल्ले शिवनेरीवर येण्यासाठी सतत भुरळ पडावी म्हणून २१ मार्च २०२४ पासून किल्ले शिवनेरी गडावर प्लास्टिक बंदी संकल्पना राबविण्यात येत आहे. अशी माहिती उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी दिली.

सर्वसामान्य लोकांमध्ये वृक्षसंवर्धनाच्या बाबतीत जाणीव जागृती व्हावी यासाठी २१ मार्च हा दिवस जागतिक वन दिन म्हणून १९७१ मध्ये जागतिक अन्न आणि कृषी संघटनेच्या २३ व्या बैठकीत हा दिन साजरा करण्याची संकल्पना पुढे आली. जागतिक वन दिन साजरा करण्यामध्ये जागतिक अन्न आणि कृषी संघटनेचा सुद्धा मोलाचा वाटा होता. संयुक्त राष्ट्र संघाने २८ नोव्हेंबर २०१२ ला जागतिक वन दिवस साजरा करण्याचा ठराव मंजुर केला. २१ मार्च २०१३ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय वन दिन साजरा करण्यात आला.

याच दिनाचे औचित्य साधून वनविभाग जुन्नर चे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहाय्यक वनसंरक्षक अमित भिसे यांनी किल्ले शिवनेरी वर येणाऱ्या पर्यटकांना आवाहन केले आहे की २१ मार्च २०२४ पासून किल्ले शिवनेरी गडावर आपणास पाण्याची बाटली सोडून कोणत्याही प्रकारचे प्लास्टिक तसेच तंबाखू, गुटखा, माचीस, बिडी सिगारेट घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे. वाढत्या उन्हामुळे आपणास फक्त पाण्याची बाटली किल्ल्यावर घेऊन जाण्यासाठी परवानगी असेल परंतु ती पाण्याची बाटली पुन्हा खाली येताना घेऊन येणे अनिवार्य करण्यात येत आहे.

५ जुन २०२४ पासून पुढे कायमस्वरूपी किल्ल्यावर प्लास्टिक पाण्याची बाटली घेऊन जाण्यासाठी बंदी असेल. वनविभाग जुन्नर व पुरातत्व विभागामार्फत पिण्यासाठी फिल्टरचे पाणी ठिक ठिकाणी उपलब्ध करून दिले आहे.

किल्ले शिवनेरी गडावर पर्यावरण नावाची श्रीमंती भविष्यात जतन आणि संवर्धीत राहण्यासाठी ही ठोस पावले वनविभागामार्फत उचलली जात असुन पर्यटकांनीही यासाठी प्रतिसाद द्यावा तसेच तपासणीसाठी सहकार्य करावे असे आवाहन वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी केले आहे.



## राज्यातील ७३ साखर कारखान्यांचे गाळप बंद!

**पुणे :** राज्यभरातील उसाचा गळीत हंगाम शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. यंदाचा गळीत हंगाम फेब्रुवारीमध्ये संपेल अशा शक्यता असताना गळीत हंगाम लांबला आहे. तर राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले आहे. त्याचबरोबर साखर उत्पादनही समाधानकारक झाले असून मागच्या वर्षीच्या तुलनेत खूप जास्त फरक जाणवणार नाही.

दरम्यान, जून ते सप्टेंबरच्या दरम्यान पाऊससरासरीच्या तुलनेत कमी झाला असला तरी नोव्हेंबर अखेरीस पडलेल्या पावसामुळे राज्यातील उस शेतीला फायदा झाला. त्यामुळे उसाचे उत्पादन वाढले आणि गळीत हंगाम लांबला आहे. तर साखरेचे उत्पादनही तुलनेने वाढले आहे. सध्या राज्यभरात १ हजार १२ लाख टन उसाचे गाळप झाले तर १ हजार २८ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.

**राज्यातील ७३ साखर कारखान्यांचे गाळप बंद**

राज्यातील १८ मार्चअखेरपर्यंतच्या अहवालानुसार राज्यातील ७३ साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले आहे. हे कारखाने कमी पाण्याच्या प्रदेशातील असून पाण्याची उपलब्धता असणाऱ्या कारखान्यांचे गाळप शेवटच्या टप्प्यात आहे. मार्चच्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील बहुतांश साखर कारखाने उसाच्या उपलब्धतेमुळे गाळप थांबवतील अशी शक्यता आहे.

सध्या अनेक साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले असून मार्च अखेरपर्यंत राज्यातील बहुतांश म्हणजे ९० टक्के कारखाने आपले गाळप बंद करतील अशी शक्यता आहे. तर त्यानंतर काही कारखाने एप्रिलच्या मध्यापर्यंत चालतील अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.साखरेचे उत्पादन वाढले

यंदा साखरेचे उत्पादन कमी होण्याची शक्यता असतानासुद्धा साखरेचे उत्पादन वाढले आहे. इथेनॉल निर्मितीवर बंधने घातल्यामुळे साखरेचे उत्पादन वाढल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.



# भाजप शिवसेनेची कोंडी ज्यांनी फोडली त्या रामदास आठवलेंची कोंडी करू नये

देशात लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. लोकसभा निवडणुकीला राज्यात सामोरे जाताना भाजपने दंड थोपटले आहेत. अबकी बार चारसो पार चा नारा भाजपने दिला आहे. मागच्या वेळी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देशात भाजप चे ३०३ खासदार निवडून आले होते.आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने देशात ४०४ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेवले आहे. त्यासाठी यंदा निवडणूक निकालाची तारीख ही ४ जून ठरली आहे. चार चा हा अंक भाजप ने चांगलाच लक्षात ठेवला आहे. मात्र राज्यात महायुतीचे सरकार चालवताना केवळ तीन यारच एकत्र झळकत आहेत.महायुती मध्ये भाजप ; शिवसेना ;राष्ट्रवादी आणि चौथा मित्र रिपब्लिकन पक्ष आहे. त्या चवथ्या मित्राकडे भाजप सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ; महायुती मध्ये नंतर आलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे फोटो सरकार आपल्या दारी कार्यक्रमात पोहोचत असताना रिपब्लिकन पक्षाला आणि रिपब्लिकन नेतृत्वाला डावलण्यात येत होते. रिपाइंप्रमुख रामदास आठवलेंचा फोटो महायुती सरकार च्या कार्यक्रमात का नाही म्हणून अनेक ठिकाणी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केलेली आहे.

रिपब्लिकन पक्षाची याबाबतची नाराजी योग्य होती. आज अनेक विविध पक्ष भाजप सोबत युती करू पाहत आहेत. अनेक पक्षांतील मातब्बर नेते भाजप मध्ये प्रवेश करीत आहेत. मी मी म्हणणारे राज ठाकरेही भाजप च्या कडेवर बसायला तयार असल्याची आतली बातमी आहे. मात्र आज इतर पक्षातील भाजप मध्ये उदंड झालेली लेकुरे. ती सर्व लेकुरे भाजप आनंदाने सांभाळत आहे. आज भाजपशी युती करण्यासाठी आणि भाजप मध्ये प्रवेशासाठी जणू नेत्यांची रीघ लागत आहे अशी भाजपची ख्याती झाली आहे. वाढत्या लोकप्रियतेमुळे; किर्तीमुळे भाजप आणि भाजपचे महाराष्ट्रातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस यांच्या समोर गगन ठेंगणे झाले आहे. आनंदाने मनोअवस्था गगन ठेंगणे अशी होत असेल त्यात चुकीचे काही नाही. पण हा आनंद गर्वाचे रूप घेत असेल तर गर्वाचे घर खाली असते आणि गर्वाचे फुगे गगनात जाण्याआधीच फुटतात हे त्रिकाल सत्य आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सारख्या अभ्यासू नेत्याला हे चांगले माहीत आहे.

आज भाजप चा वेलु गगनाला भिडल्यामुळे भाजपचे राज्यातील नेते विशेषतः स्वतः देवेंद्र फडणवीस हे भाजप चे मागचे दिवस विसरले आहेत. भाजप ने आपला मागचा प्रवास विसरू नये. आज जे भाजप ला मिठ्या मारत आहेत.गळाभेट घेत आहेत. ते अनेक लोक भाजप बाबत राजकीय अस्पृश्यता बाळगत होते. भाजप म्हणजे जातीवादी पक्ष त्यांच्या वळचणीलाही कोणी उभे राहण्याची हिम्मत करीत नसत. जातीवाद विरुद्ध धर्मनिरपेक्षता या द्वंद्वात भाजप शिवसेनेची काँग्रेस आणि पुरोगामी पक्षांनी कोंडी केली होती.आजही काँग्रेस चे नेते राहुल गांधी आणि राष्ट्रवादी चे प्रमुख शरद पवार आणि सर्व इंडिया आघाडी देशभर भाजप विरुद्ध जातीवादी पक्षाचा आरोप करीत प्रचार करीत आहेत.मात्र भाजप वरील जातिवादाचा आरोप खोडुन काढण्याचे काम रामदास आठवले यांनी केले आहे.जातीवादाच्या आरोपाने भाजप शिवसेनेची झालेली कोंडी संघर्षनायक रिपब्लिकन सुप्रीमो रामदास आठवले यांनी फोडली आहे. दलित अल्पसंख्यांक मागासवर्गीय समाज घटकांमध्ये भाजप शिवसेनेबद्दल विश्वास निर्माण करण्याचे काम ना.रामदास आठवले यांनी केले. आंबेडकरी जनतेने कधीही भाजप शिवसेना युतीला स्वीकारले नव्हते .मात्र रामदास आठवले यांनी शिवशक्ती भीमशक्ती भाजप युती केल्या मुळे भाजप शिवसेनेच्या झोळीत आंबेडकरी जनता दलित बौद्ध समाजाने आपले मतदान दिले. आंबेडकरी दलित मागासवर्गीय समाज घटकांचे मतदान मिळू नये अशी वर्षोनुवर्षं भाजप शिवसेनेची झालेली कोंडी रामदास आठवले यांनी फोडली. भाजप शिवसेनेशी रामदास आठवले यांनी युती केल्यामुळे युतीची महायुती झाली. रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षामुळे दलित मागासवर्गीय बहुजन समाज हा मोठा समाज घटक ; मोठी मतशक्ती भाजप शिवसेनेला जोडली गेली हे त्रिवार सत्य आहे.

भाजप चे राज्यातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस हे दूरदृष्टीचे नेते आणि खरे चाणक्य आहेत. त्यांनी रिपाइं प्रमुख रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षाची राज्यात लोकसभेच्या २ जागा सोडण्याची मागणी त्वरित मंजूर केली पाहिजे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हाती आता शिवसेनेचे नेतृत्व आहे. त्यांनी शिवशक्ती भीमशक्ती एकजुटीने जो इतिहास घडला त्याचे स्मरण ठेऊन त्यांच्या कोट्यातील शिर्डी ची जागा रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षाला त्वरित सोडली पाहिजे. लोकसभेची एकही जागा सोडली नाहीतरी आम्ही भाजप प्रणित एनडीए आणि राज्यात महायुती सोबत राहू अशी प्रामाणिक साथ देणारे रामदास आठवले यांच्या सारखे मित्र पक्ष शिवसेना भाजप लो कुठे मिळेल? प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा करिष्मा देशात होणार आहे. त्या ४०४ जागांमध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा ठेवायचा असेल तर रिपब्लिकन पक्षाला सन्मानाने दोन जागा महायुती ने सोडाव्यात .किमान शिर्डी ची जागा संघर्षनायक रामदास आठवले यांच्या साठी सोडावी ही रिपाइं ची माफक अपेक्षा आहे. तिकडे महाविकास आघाडी प्रकाश आंबेडकरांच्या वंचीतला ४ जागा सोडण्यास तयार झाली आहे.इकडे महायुती रामदास आठवले यांना जागा सोडण्यास चालढकल करून दिरंगाई करीत आहे.भाजप शिवसेने कडून होणारी ही दिरंगाई म्हणजे रामदास आठवलेंची कोंडी करण्याचा प्रयत्न आहे. रामदास आठवले हे पँथर आहेत.त्यांची कोंडी करणाऱ्यांच्या पुढे ते मुसंडी मारू शकतात.मात्र ते दुतोंडी नाहीत. रामदास आठवले हे प्रामाणिक नेते आहेत. मित्रपक्षाचा युतीधर्म पाळणारे नेते आहेत.

भाजप ने गोव्यात मागोप संपवला तशी शिवसेना संपवली जाईल असा इशारा शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांना त्याकाळात जाणकारांनी दिला होता.आता राज्यात शिवसेने चे काय झाले हे पाहता छोटे पक्ष गिळंकृत करण्याचे काम भाजप करतो हा भाजप वरचा आरोप आहे. रिपब्लिकन पक्ष ही समाज परिवर्तनाची चळवळ आहे. रिपाइं ला कोणीही संपवू शकत नाही.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांची रिपब्लिकन ही संकल्पना आहे.रिपब्लिकन वारसा घेऊन रामदास आठवले संपूर्ण देशात काम करीत आहेत. व्यापक विचाराने प्रामाणिकपणे त्यांनी भाजप ला देशभर साथ दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भाजप ची बाजु देशभर मांडत आहेत.भाजप आणि मोदी संविधान बदलणार हा आरोप खोडून काढण्यात रामदास आठवले यशस्वी झाले आहेत.भाजप प्रवक्त्या पेक्षा जास्त भाजप ची बाजू मांडणारे रामदास आठवले हे प्रामाणिक नेते आहेत. त्यांची भाजप शिवसेना कोंडी करीत असेल तर देशभरातील लाखो रिपब्लिकन कार्यकर्ते आणि कोट्यावधी आंबेडकरी दलित बौद्ध मागासवर्गीय जनतेत भाजप कोणता संदेश देऊ पाहत आहे? एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी रिपब्लिकन नेते रामदास आठवले यांची कोंडी करू नये.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात भाजप चे ३७० खासदार निवडून आणण्याचे उद्दिष्ट्य दिले आहे.त्यासाठी प्रत्येक बूथ मध्ये भाजप च्या बूथप्रमुखाला ३७० नवीन मते जोडण्याचे उद्दिष्ट्य दिले आहे.त्या ३७० मतांध्ये आंबेडकरी दलित मागासवर्गीय मते जोडली जाणार आहेत त्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्ता भाजप सोबत आहे. पण हे काम एकदिलाने करताना भाजप शिवसेने ने रिपब्लिकनहृदयसम्राट रामदास आठवले यांना लोकसभेची शिर्डी ची जागा सोडली पाहिजे. भाजप च्या अनेक चुका रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी माफ केल्यात. २०१९ चा विधानसभा निवडणुकीत भाजपने रिपब्लिकन पक्षाला सोडलेल्या जागांवर भाजपचेच उमेदवार उभे करून आरपीआय चे त्यांना नाव देण्यात आले मात्र चिन्ह भाजप चे कमळ घेऊन राम सातपुते आणि राजेश पवार हे आरपीआय च्या कोट्यात निवडून आलले भाजप चे आमदार आहेत. ही आरपीआय ची फसवणूक होती. आता मात्र लोकसभा निवडणुकीत आरपीआय ला एकही जागा सोडली नाहीतर रिपाइं प्रमुख रामदास आठवले यांची झालेली कोंडी रिपब्लिकन जनता कशी सहन करेल?

हेमंत रणपिसे
९००४४८८४६५

# भाजपच्या शहर विद्रूपीकरण विरोधात शिवसेनेचा पुणे आयुक्ताना घेराव

**मुंबई** - लोकसभेचे देशभर बिगूल वाजले, आचारसंहिता सुरु झाली प्रशासनाने राजकीय नेत्यांचे बोर्ड झाकले, अनेक बॅनर काढले, पण आज पाच दिवस उलटूनही सत्ताधारी भाजपच्या विरोधात कणभर पण कारवाई झाली नाही, हे प्रशासनाच भाजप साठीच राजकीय वरदान आहे की भीती हा प्रश्न शिवसेना पुणे शहराच्या वतीने करण्यात आला.

स्वच्छ सर्वेक्षणात तसेच आत्ताच झालेल्या ऋ२० परिषदेत पुणे महानगरपालिकेने लाखो रुपये खर्च करून शहरातील भिंती सुशोभीकरण केल्या होत्या, परंतु भारतीय जनता पक्षाच्यावतीने या आणि अनेक भिंतींवर राजकीय जाहिरातबाजी करुन स्वच्छ सर्वेक्षणात पुणेकरांची मान खाली घालविण्याचा प्रकार करुन शहर विद्रुपीकरण केले आहे.

तसेच देशात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली असूनही पुणे मनपा प्रशासन धृतराष्ट्राची भूमिका बजावत आहे, शहरात सर्रासपणे भाजपने निवडणूक चिन्ह, मोदींच्या घोषणा, भाजप नेत्यांची नावे भिंतींवर लावली आहेत, यातून शहर विद्रूपीकरणात अजुन हातभार लावला जात आहे.



मागील आठवड्यात शिवसेनेच्या वतीने आकाशचिन्ह व परवाना विभागाचे अधिकारी माधव जगताप यांना भेटून निवेदन देऊनही त्यावर आजतागायत कारवाई झालेली दिसत नाही.

या विरोधात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पुणे शहराच्या वतीने पुणे शहराचे नवनियुक्त आयुक्त यांस आज पुणे महानगर पालिकेत त्यांच्या कार्यालयात घेराव घालण्यात आला .

पुणे मनपा प्रशासने यावर तत्पर कारवाई करावी, अन्यथा शिवसेनेला लोकशाहीच्या रक्षणार्थ पुणे मनपा विरोधात आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असे स्पष्ट सांगण्यात आले.

आयुक्तांनीही आचारसंहितेची कारवाई चालू केली आहे आणि चुकीचे काम करणाऱ्यांवर आम्ही गुन्हा दाखल करू असे आश्वासन यावेळी दिले. यावेळी पुणे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, शिवसेना माजी गटनेते पृथ्वीराज सुतार, माजी नगरसेवक बाळासाहेब ओसवाल, अविनाश साळवे, विशाल धनवडे, पल्लवी जावळे , संगीता ठोसर, प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत, उपशहर प्रमुख समीर तुपे, आनंद गोयल, प्रशांत राणे, उमेश वाघ, युवासेना शहर अधिकारी राम थरकुडे, युवराज पारीख, गणेश काकडे, विभागप्रमुख अजय परदेशी, राजेश मोरे, राहुल जेकटे व शिवसैनिक उपस्थित होते.

## राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या बोर्ड ऑफ ट्रस्टवर भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे यांची निवड

राजदंड न्यूज नेटवर्क



राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या बोर्ड ऑफ ट्रस्टवर भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे यांची निवड झाली आहे. केंद्र शासनाकडून ही नियुक्ती करण्यात आली आहे. बोर्ड ऑफ ट्रस्ट वर नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये राजेश पांडे यांचा समावेश आहे.

भारत सरकारने राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या (छ्इढ) सन २०२४ साठी १४ सदस्यांची बोर्ड ऑफ ट्रस्ट ची नावे जाहीर केली. यामध्ये महाराष्ट्रातून भाजपा नेते तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. देशासह जगभरात ओळख असणाऱ्या आणि वर्ल्ड बुक फेअर सारख्या महोत्सवांचा माध्यमातून जगभरातील साहित्य विश्वाशी जोडलेले असलेल्या राष्ट्रीय पुस्तक न्यासाशी जोडले जाण्याची संधी यानिमित्ताने पांडे यांना मिळणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत १९५७ मध्ये वाचनाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सुरू करण्यात आलेली राष्ट्रीय पुस्तक न्यास ही संस्था आहे. या संस्थेची निर्णय प्रक्रिया बोर्ड ऑफ ट्रस्टीच्या माध्यमातून पार पडते. ही संस्था देशभर विविध पुस्तक मेळावे आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून पुस्तक वाचनाला प्रोत्साहन देते, तसेच विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, पॅनल चर्चा, पुस्तक प्रकाशन आदि उपक्रम राबवत असते.

# जे एस.पी.एमच्या राजर्षी शाहू तंत्रनिकेतन मध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**राजदंड न्यूज नेटवर्क :**

जे एस पी एमच्या राजर्षी शाहू तंत्रनिकेतन मध्ये जागतिक महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला यामध्ये मुली व महिला कर्मचाऱ्यांकरिता वैद्यकीय मार्गदर्शनाचे आयोजन केले होते. यामध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ. संदीप भुजबळ यांनी महिलांना मासिक पाळी मध्ये होणाऱ्या तक्रारी व त्या वेळेमध्ये घ्यावयाची काळजी आणि त्या संबंधित घ्यावयाचे उपचार व लसीकरण याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आहार तज्ञ स्वाती संधन यांनी किशोरवयीन मुलींनी त्यांची निरोगी शारीरिक वाढ होण्यासाठी कोणता सकस आहार घ्यावा




याबाबत मार्गदर्शन केले आणि स्त्री रोग तज्ञ डॉ. हृदया जोशी यांनी स्त्रियांनी निरोगी आयुष्य जोपासण्यासाठी व्यायाम, ध्यानधारणा खूप गरजेची आहे असे सांगितले.

यावेळी संस्थेच्या प्राचार्या डॉ. सरिता गायकवाड यांनी उपस्थित आमचे स्वागत केले आणि महिला व तरुण मुलींमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणाबाबत चिंता व्यक्त केली व याबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. यावेळी सर्व विभाग प्रमुख, महिला कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल पाटील यांनी केले व प्रा. नीलम करपे यांनी आभार मानले.

## चवदार तळे सत्याग्रहाच्या ९७ व्या वर्धापन दिनी

# रिपब्लिकन पक्षाच्यावतीने आज महाडच्या क्रांतिस्तंभाजवळ जाहिर अभिवादन

**मुंबई** - महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दि.२०मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळे येथे केलेल्या क्रांतिकारी ऐतिहासिक सत्याग्रहाच्या ९७व्या वर्धापनदिनी उद्या दि. २० मार्च २०२४ रोजी महाडच्या क्रांतिभुमीत चवदार तळ्याजवळील क्रांतिस्तंभाजवळ रिपब्लिकन पक्षाच्या रायगड जिल्हाच्या वतीने जाहिर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सभेस रिपांइचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले प्रमुख



मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी आमदार भरतशेठ गोगावले आणि रिपाइंचे रायगड जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड उपस्थित राहणार आहेत.तसेच रिपाइंचे नवनियुक्त कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे आणि रिपाइंचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे उपस्थित राहणार आहेत. तसेच सुमित मोरे,सुशांत सकपाळ,केशव हाटे.प्रमोद महाडिक,एम.डी कांबळे,सुदास मोरे,महाड तालुका अध्यक्ष मोहन खांबे,लक्ष्मण जाधव,प्रभाकर जाधव,नितेश हाटे,अशोक मोहिते,सिध्दार्थ सकपाळ,मनिश मोरे,शेट्टे,नरेश साळवी,शंकर मोरे,जयराज जाधव,प्रमोद शिर्के,नवनाथ लोकरे,भिवा शिंदे,धनराज पवार आदि रिपाइं कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

ऐतिहासिक चवदार तळ्याच्या सत्याग्रहा निमित्त महाड क्रांतिस्तंभा जवळ जाहिर अभिवादन सभा आयोजित करण्याची परंपरा ५०वर्षापूर्वि भारतीय दलित पँथरच्या माध्यमातुन ना.रामदास आठवले यांनी तत्कालीन दलित पँथरचे रायगड जिल्हातील जेष्ठ पँथर दिवंगत एम.एस. जाधव(तुडील) यांनी सुरु केली.

तेव्हा पासून ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपाइं तर्फे महाड क्रांतीस्तंभा जवळ जाहिर अभिवादन सभेचे आयोजन केले जाते अशी माहिती रिपाइं चे महाड तालुका अध्यक्ष मोहन खांबे यांनी दिली.

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९७व्या वर्धापन दिनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक सायंकाळी महाड चवदार तळ्यापासून काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता रिपाइं चे रायगड जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड याच्या अध्यक्षतेत जाहिर अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे.या सभेत ना.रामदास आठवले आणि त्यांच्या पत्नी सौ. सीमाताई आठवले उपस्थित राहणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# धैर्यशील मोहिते पाटलांची माढ्यात दणक्यात प्रचाराला सुरुवात

## पश्चिम महाराष्ट्रात भाजपाची डोकेदुखी वाढणार?



**अकलुज,** माढा लोकसभेसाठी इच्छुक असलेले धैयशील मोहिते पाटील यांना भाजपनं डावलत पुन्हा एकदा विद्यमान खासदार रणजित निंबाळकर यांना उमेदवारी दिल्यानं धैयशील मोहिते पाटील नाराज होते. दोन दिवसांपूर्वी या नाराजीचं महानाट्य खुद्द भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांनाही अनुभवायला मिळालं होतं. यानंतर मोहिते पाटील यांची नाराजी भाजपाला परवडणारी नसल्याचं सांगत याबाबत पक्षश्रेष्टींना बोलणार असल्याचं आश्वासन संतप्त मोहिते समर्थकांना दिल्यावर महाजन यांची सुटका झाली होती. अजूनही भाजपकडून मोहिते पाटील यांच्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झाला नसला, तरी धैर्यशील मोहिते पाटील यांनी काल पासून माढा लोकसभा मतदारसंघात अनौपचारिकरित्या प्रचाराला सुरुवात केली आहे. पहिल्याच दिवशी करमाळा तालुक्यात श्रीदेवीचा माळ, पोथरे, कामोणे, बिटरगावश्री, आळजापूर,खडकी, जातेगाव, पुनवर, वडगाव आणि मांगी या गावात गावभेट दौऱ्याला सुरुवात केली आहे. या वेळी कोणत्याही परिस्थितीत लोकसभा लढवायची या मानसिकतेमध्ये असणारे धैयशील मोहिते पाटील समर्थकांकडून शरद पवार यांची तुतारी घेण्याचा आग्रह सुरू असला तरी अद्याप मोहिते पाटील यांनी भाजप सोडण्याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका घेतलेली नाही. असं असताना कालपासून धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार म्हणून दौऱ्यासाठी करमाळा येथून सुरुवात केली आहे. यामळे भाजपच्या अडचणी वाढणार

असून तातडीनं मोहिते पाटील प्रश्न सोडवला नाही तर असून तातडान माहित पाटाल प्रश्न सोडवला नाहा तर पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, बारामती, सोलापूर आणि माढा या चार लोकसभा मतदारसंघात मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागणार आहे.

विजयसिंह मोहिते पाटील यांनी वसंतदादा पाटील यांच्यानंतर त्यांच्या गटाचं नेतृत्व केल्याने पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात आणि गावात मोहिते पाटील याना मानणारा मोठा वर्ग आहे. शरद पवार यांच्यानंतर सर्वात जास्त कार्यकर्त्यांची फळी जपणारा नेता म्हणून विजयसिंह मोहिते पाटील यांची ओळख आहे. हेच गणित डोक्यात ठेवून थेट नरेंद्र मोदी याना आणून २०१९ मध्ये मोहिते पाटील याना भाजप मध्ये प्रवेश देण्यात आला होता. गेल्यावेळी पक्षाने दिलेला उमेदवार म्हणून रणजित निंबाळकर याना मोठा विजय देऊन राष्ट्रवादीच्या हातातून हा मतदारसंघ मोहिते पाटील यांनी खेचून आणला होता.यावेळी पहिल्यापासून मोहिते पाटील यांनी माढा लोकसभेवर दावा केल्यानंतर त्यांनाच उमेदवारी मिळेल, अशी अटकळ बांधली जात होती. मात्र पक्षाने पुन्हा निंबाळकर यांनाच संधी दिल्याने मोहिते समराठक नाराज झाले. यानंतर माढा आणि निंबाळकर याना पाडा ही मोहीम समर्थकांनी सुरु केली. आता त्याचा पुढचा अंक म्हणून थेट मोहिते पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार म्हणून गावभेट दौऱ्याला सुरुवात करून कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत.

दुसऱ्या बाजूला माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या सहा पैकी पाच आमदारांनी भाजपने दिलेले उमेदवार रणजित निंबाळकर यांनाच विजयी करण्याचा निर्धार काल रात्री टेम्भर्णी येथे झालेल्या बैठकीत व्यक्त केला. मोहिते पाटील यांच्या अकलूजयेथील निवासस्थानी झालेल्या महानाट्याचा दुसरा भाग काल टेम्भूर्णी येथे पाहायला मिळाला होता.

खासदार रणजित निंबाळकर यांनी बोलावलेल्या बैठकीस माळशिरस भाजप आमदार राम सातपुते,माण खटाव भाजप आमदार जयकुमार गोरे, सांगोला शिवसेना आमदार शहाजीबापू पाटील, माढा राष्ट्रवादी आमदार बबनदादा शिंदे, करमाळा आमदार संजयमामा शिंदे यांचेसह लोकसभा मतदारसंघातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. यामुळे मोहितेपाटील विरुद्ध मतदारसंघातील बहुतांश आमदार असे चित्र असताना

भाजप समोर मोठा पेच उभारला आहे. मोहिते पाटील नाराज झाले तर याचा दणका माढा व सोलापूर या जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघाला बसणार असून याशिवाय बारामती, सातारा, सांगली आणि कोल्हापूर याही लोकसभा मतदारसंघात मोहिते पाटील यांचीनाराजी भाजपाला अडचणीची ठरू शकणार आहे. पाटील यांनी यापूर्वी



## पुण्यातून बहुमताने मुरलीधर मोहोळ यांना खासदार विजयी करायचा निर्धार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होताना पुण्यातून बहुमताने मुरलीधर मोहोळ यांना खासदार विजयी करायचा, असा निर्धार बैठकीत करण्यात आला. यावेळी सर्वांनी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहण्याचे आवाहन केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पर्वती विधानसभा मतदारसंघातील महायुतीतील घटक पक्षांच्या समन्वय समितीची बैठक उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनात झाली. उत्स्फूर्त वातावरणात झालेल्या या बैठकीस महायुतीत विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

बैठकीस संजय माशिलकर, आमदार माधुरीताई मिसाळ, धीरज घाटे, राजेश पांडे, श्रीनाथ भिमाले, बाबा मिसाळ, प्रदीप देशमुख, संजय सोनावणे, महेश शिंदे, सिद्धार्थ धेंडे संतोष नांगरे, राजेंद्र शिळीमकर, अशोक शिरोळे, भरत लगड, सुभाष जगताप, संदीप खर्डेकर यांच्यासह महायुतीतील घटकपक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## ऊस पिकासाठी महाधन एक शाश्वत आणि फायदेशीर पीक पोषण

**सातारा :** जमिनीच्या शाश्वत उत्पादकतेसाठी मुख्यतः पोषक तत्वांचा पुरेसा आणि संतुलित प्रमाण वापर करणे आवश्यक असते, ज्यामुळे उच्च पोषक प्रतिसाद देणाऱ्या ऊस पिकाची योग्य वाढ होते आणि शेवटी अधिक उत्पादन मिळते. जमिनीची शाश्वतता भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांसारख्या प्राकृतिक सुपीकता ठरविणाऱ्या घटकांवर अवलंबून असते. वापरलेल्या खतांच्या मात्रेची कार्यक्षमता नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, सेंद्रिय सामग्री, सूक्ष्म पोषक घटक आणि पाण्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. हे सर्व घटक सध्या अतिशय विषम (जास्त किंवा कमी) प्रमाणात वापरले जात होते आणि वापरली जात आहेत. ज्यामुळे जमिनीत पोषक तत्वांची कमतरता दिसून येत आहे.आणि परिणामी जमिनीचा ऱ्हास होत चाललेला आहे. मातीतील किमान पोषक तत्त्वांचे प्रमाण पुरेशा प्रमाणात न राखले गेल्याने, पोषक तत्त्वांची कमतरता, रोपांची कमजोर वाढ आणि कृषि उत्पादकतेत घट होऊ शकते. म्हणून, माती ही एक मर्यादित आणि अनुतनीकरणीय साधन आहे, जिचे वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांच्या फायद्यासाठी संरक्षण आणि व्यवस्थापन जबाबदारीने करणे आवश्यक आहे.

मातीचे आरोग्य आणि त्याचे परिणाम: ऊसाच्या मातीची गुणवत्ता आणि उत्पादकता दीर्घकाळ जी सद्यपरिथितित ढासळलेली दिसत आहे यामध्ये प्रमुख्याने कारणीभूत असलेल्या घटकांपैकी पुरेशा प्रमाणात पोटॅशिक खतांच्या ऐवजी नायट्रोजनयुक्त आणि युरिया-आधारित खतांचा जास्त वापर आणि आवश्यक सूक्ष्म पोषक तत्त्वांचा योग्य प्रमाणात होत नसलेला वापर.

ऊस हे दीर्घकालीन आणि जास्त उत्पादन देणारे पीक असल्याने, हंगामानुसार लागवडीनंतर १२ ते १८ महिन्यांच्या दरम्यान तोडणीसाठी तयार होते. महाधन ग्रीटेक लिमिटेडने विकसित केलेल्या पिकाच्या पोषणाचे सोपे समाधान वापरून, मुख्य व्यवस्थापन कार्यक्रमाचे अवलंब करत खतांच्या असमान वापराचे प्रतिकूल परिणाम कमी केले जाऊ शकतात. या कार्यक्रमामुळे मिळणाऱ्या फायद्यांमध्ये संतुलित पोषण उपायाद्वारे मातीच्या आरोग्याची काळजी घेण्यास मदत मिळणे, त्यामुळे पिकांना सर्व आवश्यक पोषक तत्वे उपलब्ध होणे आणि शेतकऱ्यांना वापरण्यास सुलभता समाविष्ट आहेत. यामुळे अनावश्यक खतांच्या सामग्रीवर होणारा शेतकऱ्यांचा अतिरिक्त खर्चही वाचतो. या पोषण समाधानाची निश्चिती योग्य स्रोत वापरून, योग्य दरात, योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी केली जाते. या पोषण कार्यक्रमाचा एक अतिरिक्त फायदा म्हणजे, यामुळे पोषक तत्वांचे होणारे नुकसान आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन टाळले जाते, आणि पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्यात मदत होते.

महाधन ॲग्रीटेकच्या आरअँड डी पीक पोषण व्यवसायचे जनरल मॅनेजर डॉ. प्रकाश गवडा म्हणाले, शाश्वत शेतीसाठी संतुलित पीक पोषण हा महत्त्वाचा उपाय आहे: खतांचे वेळापत्रक तयार करणे, योग्य वेळी खतांचे योग्य मिश्रण मिळणे, शास्त्रीय शिफारस आणि मातीची पोषक तत्त्वे यांच्या आधारे योग्य प्रमाणात गणना करता येणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना योग्य संसाधनांचाही पुरेसा आधार मिळत नसल्याने या सर्व बाबींमध्ये शेतकरी तज्ञ नसतात. बहुतेक शेतकरी त्यांच्या शेतीच्या उपायांसाठी प्रामुख्याने सामग्री पुरविणाऱ्या स्थानिक डीलर्सवर अवलंबून असतात, जे त्यांच्यासाठी योग्य आणि किफायतशीर असू शकतात किंवा नसतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांकडे त्यांच्या सर्व समस्यांच्या मुद्द्यांची काळजी घेऊन त्यांचे निवारण करण्यासाठी पोषण समाधान सहज उपलब्ध असले पाहिजे आणि त्यांना उच्च उत्पादन आणि प्रीमियम दर्जेच्या उत्पादनाद्वारे जास्तीत-जास्त परतावा देण्याच्या उद्देशाने पिकावरील पोषणाचा खर्च कमी करण्यात मदत केली पाहिजे. महाधन क्रॉपटेक शुगरकेन (क्रॉपटेक ९:२४:२४) संतुलित पोषणाचे मूलभूत तत्त्व म्हणजे खतांच्या वापरासंदर्भात शेतकऱ्यांच्या समस्येच्या मुद्द्यांचे निराकरण करणे आणि पिकाची निरोगी वाढ आणि चांगल्या उत्पादनासाठी आवश्यक आणि सूक्ष्मपोषक घटकांचे योग्य प्रमाण उपलब्ध करणे आहे. क्रॉपटेक शुगरकेन (क्रॉपटेक ९:२४:२४) हे एक नाविन्यपूर्ण, प्रगत आणि मूल्यवर्धित खत आहे, जे संपूर्ण पीक पोषण समाधान पुरविते. या उत्पादनाला पुढे न्यूट्रिएंट अनलॉक टेक्नॉलॉजी (छणढ) द्वारे सक्षम केले जाते, जे मातीतील वापरलेल्या व निश्चित पोषक तत्त्वांच्या खतांच्या वापराची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करते. सोबत, त्याचा प्रत्येक दाणा प्रत्येक रोपाला एकसमान पोषक तत्त्वाचा पुरवठा करते, ज्यामुळे पिकांची चांगली रुजवण आणि सातत्यपूर्ण वाढ होते.

## माढ्यात भाजपच्या घटक पक्षांची नाराजी मित्रपक्ष निंबाळकर यांच्या विरोधात





**अकलुज :** भारतीय जनता पक्षाने माढयाची उमेदवारी रणजीतसिंह निंबाळकर यांना जाहीर केल्यानंतर माढा लोकसभा मतदारसंघामध्ये प्रत्येक तालुक्यात बैठका घेण्यास सुरुवात केली. मात्र सदर बैठकीला भाजपचे घटक पक्ष यांना बोलावले नाही त्यांना विश्वासात घेतले नाही त्यामुळे याचा फटका रणजीत निंबाळकर यांना बसण्याची जोरदार शक्यता आहे रयत क्रांती संघटना बच्चू कडू यांचा प्रहार संघटना यांना कुठेही भारतीय जनता पक्षाने सन्मानाने बोलावले नाही त्यामुळे घटक पक्ष नाराज आहेत नुकतेच माढा येते संजय शिंदे यांच्या फार्म हाऊस वरती रणजीत निंबाळकर यांच्या प्रचाराची बैठक संपन्न झाली या बैठकीला कोणालाही निमंत्रण दिले गेले नाही त्यामुळे आगामी काळात मित्रपक्ष माढ्यात भाजप विरोधात तीव्र संताप व्यक्त करतील यात काही शंका नाही भारतीय जनता पक्षाने आम्हाला विश्वासात घेतले नाही त्यामुळे माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये रणजीत सिंह निंबाळकर यांच्या विरोधात भूमिका घेणार असे रोखठोक मत मत रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते राहुल बिडवे यांनी सांगितले

रणजीत निंबाळकर हे सोलापूर जिल्ह्यातील नसून सुद्धा मागच्यावेळी त्यांना खासदारकीला निवडून दिले भरघोस मताने त्यांच्या पदरात मताचे दान टाकले परंतु खासदार झाल्यानंतर त्यांनी मोजकेच पुढारी हाताशी धरले त्यामुळे सामान्य माणूस आज संतप्त झालेला आहे जो तो निंबाळकर विरोधात प्रतिक्रिया देत आहे याचा भारतीय जनता पक्षाने विचार करावा घटक पक्ष म्हणजे भाजपचे गुलाम नाहीत पाहिजे तेव्हा तुमच्या घरची धुणीभांडी करतील भाजपच्या नेत्यांनी वेशांतर करून गाववाड्यात यावे आणि सामान्य माणस काय बोलतात रणजीत निंबाळकर यांच्या विषयी किती त्यांच्या मनामध्ये राग आहे हे त्यांना कळेल जरी निंबाळकर यांना उमेदवारी दिली असली तरी सोलापूर जिल्ह्यातील माढा करमाळा माळशिरस सांगोला येथील जनता ही निंबाळकरांना अजिबात मतदान करणार नाही असे रोखठोक राहुल बिडवे यांनी सांगितले.

> **माढा लोकसभेचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर कोणत्याही बैठकीत आम्हाला बोलवले नाही बहुतेक भाजपच्या गर्विष्ठ नेत्यांना आमची गरज वाटत नसेल परंतु आमच उपद्रवमुल्य काय आहे हे निबांळरांना पराभूत करुणच दाखवून देऊ**
>
> **- राहुल बिडवे, राज्य प्रवक्ते रयत क्रांती संघटना.**

## वाईमध्ये राष्ट्रवादी घरभेद्यांना रोखण्यासाठी चक्क पाटलांनीच फुंकली तुतारी

**वाई :** सध्या राजकारणामध्ये निष्ठेला फार महत्त्व राहिलेले नाही. आपल्या स्वार्थासाठी विचारवंतांच्या व युग पुरुषांच्या विचाराची होळी करणाऱ्या प्रवृत्तीला धडा शिकवण्यास ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सज्ज झाला आहे. दक्षिण काशी समजणाऱ्या वाई येथून राष्ट्रवादीने घर भेदांच्या विरोधात चक्क पाटलांनीच तुतारी फुकल्यामुळे फुटीर गटामध्ये अस्वस्थता पसरली आहे.

वाई वाई येथील साठे मंगल कार्यालयात झालेल्या या मेळाव्याला वाई- खंडाळा- महाबळेश्वर तालुक्यातील निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुकाध्यक्ष दिलीप बाबर यांनी स्वागत केले . या ठिकाणी महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव असलेले नेते घडले. त्यामध्ये स्वर्गीय किसन वीर आबा लक्ष्मणराव पाटील व प्रतापराव भोसले, मदनराव पिसाळ आप्पा, नारायण पवार, सर्जेराव जाधव, गजानन बाबर या नेत्यांचे नाव नेहमीच आदराने घेतले जाते. परंतु, आता त्यांचे काही वंशज हे वेगळ्या




वाई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्याला मार्गदर्शन करताना निष्ठावंत मान्यवर (छाया- अजित जगताप -वाई )

विचाराचे पाईक झालेले आहेत. त्यामध्ये राजकारण व अर्थकारण आलेलेच असेल तर आता वाईच्या कृष्णा नदीच्या पुला खालून बरच पाणी वाहू लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीपेक्षा पक्षातील घरभेद्यांना रोखण्यासाठी सज्ज झालेले आहे. हे वायू विधानसभा मतदारसंघात स्पष्टपणे जाणवले.काल वाई मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भव्य मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला खासदार श्रीनिवास पाटील, माजी मंत्री व आमदार बाळासाहेब पाटील, आमदार शशिकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, सरचिटणीस राजकुमार पाटील, युवा नेते सारंग पाटील, ड विजयसिंह पिसाळ, प्रसाद सुर्वे, निलेश ढेरे, केदार गायकवाड, रमेश पिसाळ, डॉ. सतीश बाबर, संतोष शिंदे, सुधाकर गायकवाड, रवींद्र इथापे, अंकुश मालुसरे सतीश बाबर, समाधान कदम, शैलजा खरात ,मालन चव्हाण, मोहिनी पिसाळ यांच्यासह ग्रामीण भागातून आलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तुतारी चिन्ह चांगलेच लक्षात ठेवून वातावरण निर्मिती करण्याचा विडा उचललेला आहे.

तसं पाहिजे तर वाई- खंडाळा- महाबळेश्वर या तीन तालुक्याचा मिळून एक मतदार संघ झालेला आहे. या विधानसभा मतदारसंघांमध्ये मदनराव पिसाळ आप्पा यांनी अपक्ष म्हणून बाजी मारली त्यानंतर अपक्ष म्हणून मदन भोसले यांनी सुद्धा विधानसभेच्या निवडणुकीत यश मिळवले होते. आता राजकीय संपूर्ण समीकरण बदललेले आहे आता राजकीय विरोधक आता महायुतीच्या माध्यमातून एकत्र आलेले आहेत. पण मतदारांना हा निर्णय पचलेला नाही. याची चुणूक या मेळाव्यात पाहण्यास मिळाली .

खासदार श्रीनिवास पाटील यांनी आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये समाचार घेताना सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामुळे अनेकांना संधी मिळाली. या संधीचे त्यावेळी त्यांनी सोनं केलं पण आता राजकारणामध्ये स्वतःला कसं सोनं मिळेल. सत्तेच्या विडीच भीतीपोटी काहीजण या निघून गेले आहेत आता त्यांचे परतीचे दोर कापलेले आहेत. मतदारांच्या मनातील कौल दाखवण्यासाठी सर्वांनी सामुदायिक प्रयत्न केले पाहिजे. असे अनेक मान्यवरांनी बोलून दाखवले. या कार्यक्रमाला खासदार श्रीनिवास पाटील यांनी प्रथमच आपली भूमिका स्पष्ट करताना ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांच्या सोबत असलेली बाल मैत्री खासदार श्रीनिवास पाटील यांनी दाखवून दिली . त्यांच्या भाषणामुळे चांगलीच प्रेरणा मिळालेली आहे. कोणत्याही घरभेदी नेत्याचं नाव न घेता प्रमुख वक्त्यांनी तोफ डागली.

महायुतीच्या माध्यमातून सामान्यांना लुटण्याचे नूतनीकरण करण्यासाठीच ४०० पार असं वाक्य बोलले जात आहे. परंतु आता एकदा तडीपार करण्याची वेळ आली आहे. असे काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या मेळाव्याला प्रकाश पिसाळ, कैलास पाटील, निखिल चव्हाण, विजय जगताप, नरेश सोनवले , आण्णा खामकर, प्रदीप सावंत, संदीप कांबळे जयवंत बाबर, कृष्णा सावंत, निलेश ढेरे, राजाभाऊ खरात, भैय्या पिसाळ व वाई लोणंद खंडाळा पारगाव शिरवळ महाबळेश्वर परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.

# उन्हाळा सुरू झालाय, पाणीटंचाई तातडीने सोडवा !

**बाणेर,बालेवाडी :** गेल्या काही महिन्या पासून बाणेर,बालेवाडी, पाषाण,सुस,म्हांळुगे परिसरात निर्माण झालेली कृत्रीम पाणी टंचाईला या विभागातील जनता तोंड देत आहे पाणीप्रश्नाबाबत यात कोणतीही अडचण नव्हती समान आणि योग्य दाबाचा पाणी पुरवठा केला जात नाही अवेळी पाणी पुरवठा करणे, कमी दाबाणे पाणी पुरवठा करणे या साख्या कृत्यामुळे जनता आणि सोसायटी त्रस्त झाली आहे पाणी सोडणारे वॉलमॅन तोंडे पाहून आणि मलीदा जिथे मिळेला त्या ठिकाणी किंवा विभागाला योग्यरित्या पाणी पुरवठा करत असल्याची ओरड आणि तक्रारी सूध्दा या विभागात आहे जाणून बूजून समान पाणी पुरवठा केला जात नाही या मूळे या वॉलमनवर पाणी पुरवठा विभागाने लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे

नगरसेवक पाय ऊतार झाले आणि कृत्रीम पाणी टंचाईला सुरवात झाली जनतेला पिण्याच्या पाण्यापासून वंचीत ठेवण्याची आणि जनतेला वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे ऊन्हाळा सुरू झाला मग वर्ष

भरात पाण्याचे योग्य नियोजन का करण्यात आले नाही

टॅंकर लॉबी आजही रोज पाणी पुरवठे करत आहे राजकारणांचे चेलेचपाटांच्या पाणी टॅंकर माफीया मूळे पाणी टंचाई कृत्रीम केल्या जात आहे पिण्याचे पाणी बांधकाम क्षेत्राला केल्या जात आहे ज्या ठिकाणी बांधकाम सूरू आहे त्या ठिकाणी जास्त वेळ आणि मूबलक पाणी पुरवठा केला जातो पॅन कार्ड क्लब रोड ,धनकुडे वस्ती ,कळमकर चौक, बाणेर वस्ती, विधाते वस्ती अशा अनेक ठिकाणी कमी दाबाने आणि अवेळी पाणी पुरवठा केला जात असल्याची तक्रार जनता करत आहे अनेक सोसायट्यांना आता पासून टॅंकर बोलावून पाण्याची समस्या सोडवावी लागत आहे बालेवाडी,विधातेवस्ती, बाणेर गावठाण येथे तर आठ आठ दिवस पाणी पुरवठा केला जात नाही कृत्रीम पाणी टंचाई निर्माण करण्याचा आता पासूनच प्रकार केला जात आहे कोठे कमी दाबाचा पाणी पुरवठा करायचा हे

पहिलेच ठरवलेले दिसते यात टॅंकर लॉबी आणि पाणी सोडणारे वॉलमॅन यांच्यात हात मिळवणी झाल्याचे जनतेत ओरड आहे पाणी पूरवठा सोडणारे हाताशी धरणे हे टॅंकरमाफियांनी ठरवलेली यंत्रणा आहे पाणीपुरवठा यंत्रणांच्या चाब्या टॅंकरमाफियांच्या हाती आल्यामुळे महानगरपालिका सुध्दा हतबल झाली आहे पिण्याचे पाणी टॅंकरव्दारे आणि नळाव्दारे बांधकाम विभागाला ऊन्हाळ्यात बंदी करण्याची मागणी येथिल जनता करत आहे

बाणेर,बालेवाडी, सुस, पाषाण, औध हा विभाग टॅंकर मुक्त झाला आणि या विभागाला समान दाबाणे पाणी पुरवठा केला जात असल्याची ओरड करणारे मनपाचे पाणी पुरवठा अधिकारी आणि माजी नगरसेवक

यांना पाण्याची टंचाई का निर्माण होत आहे हे यांना दिसत नाही काय ? कृत्रीम रित्या आणि जाणूनबूजून पाणी टंचाई करण्या प्रकार या विभागात केला जात आहे बाणेर, विधातेवस्ती, ज्युपिटर हॉस्पीटल जवळील विभागात पाणी सोडणारा वॉलमॅनने तर हाताखाली पाणी सोडण्यासाठी चार ते पाच माणसे ठेऊन अधिकृत वॉलमॅन घरी बसून राहत असल्याची तक्रार जनता करत आहे धरणात योग्यरित्या मूबलक पाणी असतांनाही आणि मनपाकडून योग्यरित्या पाणी पुरवठा होत असतांनाही मग या विभागात पाणी टंचाई निर्माण का होत आहे हा संशोधनाचा विषय आहे.

पाणी पुरवठा योग्यरित्या आणि समान दाबाने का केला जात नाही तर काही ठिकाणी आठ आठ दिवस पाणी पुरवठा केला जातो याची चौकशी करण्याची मागणी या विभागातून होत आहे.

तसेच पिण्याचे पाणी टॅंकरव्दारे बांधकाम क्षेत्राला देणे आणि नळाव्दारे पिण्याचे पाणी बांधकाम क्षेत्राला देण्याची बंदी करण्याची मागणी सुध्दा या विभागातून होत आहे ऊन्हाळा सुरू झाला योग्य नियोजन करून समान आणि योग्य दाबाणे पाणी पुरवठा केला जावा




**विधाते वस्तीच्या काही विभागात रात्री बेरात्री पाणी पुरवठा केला जातो तसेच कमी दाबाणे पाणी पुरवठा केला जात असल्यामुळे पाणी टंचाईला आम्हाला तोंड द्यावे लागत आहे तर पाणी सोडणारा वॉलमॅन हा कपिल मल्हार सोसायटी जवळच राहतो त्याच्या बाजूला वाहन धूणारे दूकानाला योग्य पाणी पुरवठा कसा केला जातो आणि हा वॉलमन स्वतः पाणी सोडत नाही तर याने हाताखाली पाच माणसे ठेवली आहे पाणी सोडण्याचे काम यांच्या कडून करून घेत आहे अशा प्रकरणाची चौंकशी पाणी पुरवठा विभागाने करावी**

**– संतोष जाधव विधाते वस्ती**

# माढा लोकसभा मतदारसंघात भाजपमध्ये होणार बंडखोरी ?

## मोहिते पाटील यांच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

**सोलापूर :** भारतीय जनता पक्षाने माढा लोकसभा मतदारसंघात मोहिते पाटील परिवाराला डावलून पुन्हा रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी दिल्यामुळे महायुतीत बंडखोरी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माजी मंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटील यांनी बंडखोरी करून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची तुतारी हाती घ्यावी किंवा अपक्ष निवडणूक लढवावी, असा आग्रह त्यांच्या कार्यकर्त्यांनी धरला आहे. त्यामुळे मोहिते पाटील या निवडणुकीत काय भूमिका घेतात याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.




रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना माढा लोकसभा मतदारसंघातून निवडून आणण्यासाठी मागील निवडणुकीत मोहिते पाटील परिवाराने पूर्ण सहकार्य केले होते. या निवडणुकीत मात्र या परिवारातील धैर्यशील मोहिते पाटील हे या मतदारसंघातून भाजपच्या तिकिटाचे दावेदार होते. मात्र, त्यांच्या नाकावर टिच्चून नाईक निंबाळकर यांनी पुन्हा उमेदवारी प्राप्त केली आहे.

धैर्यशील मोहिते पाटील यांचे काका विजयसिंह मोहिते पाटील आणि एकूणच मोहिते पाटील परिवाराचे सोलापूर जिल्ह्यातील राजकारणावर मोठे वर्चस्व आहे. त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील राजकारणात रणजितसिंह निंबाळकर आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर यांची केवळ स्पर्धाच नाही तर वितुष्ट आहे. त्यामुळे रणजीत सिंह यांना पुन्हा उमेदवारी मिळू नये, अशी रामराजे यांची देखील इच्छा होती. मात्र, ती असफल झाल्याने धैर्यशील मोहिते पाटील यांनी बंडखोरी केल्यास रामराजे नाईक निंबाळकर यांची रसद देखील त्यांना मिळू शकते.

# पाटण तालुक्यात वन्यप्राण्यांचे हल्ले सुरूच

### वनविभागाने ठोस उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन करणार -राजाभाऊ शेलार



**पाटण :** पाटण तालुक्यातील कोयना भागात वन्यप्राण्यांचे हल्ले सुरूच असून सलग दोन दिवस तीन जणांवर गव्याचे जीवघेणे हल्ले झाले आहेत या अगोदरही अनेक घटना घडल्या असुन वनप्राण्याच्या हल्ले व शेतीचं नुकसान यावर वनविभागाने येत्या आठ दिवसांत तात्काळ ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा आचारसंहितेची पर्वा न करता पाटण तालुका मानवी हक्क संरक्षण समितीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पाटण तालुका मानवी हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष, पाटण पंचायत समितीचे सभापती राजाभाऊ शेलार यांनी वनविभागाला दिला आहे.


परवाच मणेरी गावाच्या हद्दीत रविवारी दुपारच्या सुमारास शुभम रामचंद्र बाबर रा. मणेरी वय १७ सिताराम शिवराम सावंत रा.मणेरी वय ४७ याचे वर रानगव्याने जीवघेणा हल्ला केला.

शनिवारी घाटमाथा येथील महिलेवर गव्याने हल्ला केला होता रविवारी दोघांवर जीवघेणे हल्ले झाले आहेत.सततच्या वनप्राण्यांच्या हल्ला व शेतीचं नुकसानाने स्थानिक त्रस्त असुन यावर येत्या आठ दिवसांत वनविभागाने ठोस उपाययोजना करावी अन्यथा भागातील जनतेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# मैत्रित झालेल्या गैरसमजातून २ जणांनी केला विद्यार्थ्याचा कोयत्याने खून

**राजदंड न्यूज नेटवर्क :** मैत्रीत झालेल्या गैरसमजातून २ जणांनी एका १५ वर्षीय शाळकरी विद्यार्थ्याचा कोयत्याने खून केला. ही घटना पुण्यातील पानशेत रस्त्यावरील मणेरवाडी येथील आनंदवन सोसायटीत घडली. प्रकाश हरिसिंग रजपूत (वय १५ ) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश हा खानापूर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत होता. तो नेहमीप्रमाणे शाळेत गेला. १०.३० वाजता शाळा सुटल्यावर तो घरी आला.



मणेरवाडी हद्दीतील मह डोंगरावरील आनंद सोसायटीतील फार्ममधील घरात त झोपेत असताना हल्लेखोरांनी त्याच्या डोक्यात कोयते, धारधार शस्त्रांनी वार केले.

जीव वाचवण्यासाठी तो घरातून पळत सुटला. मात्र, शंभर फूट अंतरावर तो कोसळला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश आणि हल्लेखोर तरुण (२ अल्पवयीन) यांची एक मैत्रीण होती. हल्ला करणाऱ्या एका मुलाशी ती मुलगी बोलत नव्हती. प्रकाशच्या सांगण्यावरून ती माझ्याशी बोलत नसल्याचा राग मनात ठेवून त्याने हे कृत्य केल्याचं निष्पन्न झाले आहे.

# शिरोळकरांवर पुढील १0 वर्षासाठी जमीन आरक्षणाची टांगती तलवार : पृथ्वीराजसिंह यादव

**शिरोळ :** शिरोळचा विकास आराखडा दिनांक ५ मार्च २०२४ रोजी प्रसिध्द झाला आहे. त्यामध्ये बऱ्याच शेतकरी, नागरीकांच्या जमिनी रस्ते, बगिचा, शाळा, खेळाचे मैदान यासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.विकास आराखड्याचा अहवाल पाहिला असता त्यांनी दर दोन वर्षांनी एक टप्पा अशा पुढील दहा वर्षात पाच टप्प्यात शेतकऱ्यांची जमीन आरक्षीत करण्याचा मसुदा जाहिर केला आहे. जमीन आरक्षणाचे संकट झोपवण्यासाठी एकत्रितपणे लढा उभारण्याची गरज आहे जमीन आरक्षण अन्यायाविरुद्ध मी शेतकऱ्यांच्या मागे ठाम उभा राहून शासन दरबारी त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे असे आश्वासन युवा नेते पृथ्वीराजसिंह यादव यांनी सोमवारी झालेल्या पत्रकार बैठकीत दिले

शिरोळचा विकास आराखडा तयार करीत असताना जमीन आरक्षणाच्या पहिल्या टप्प्यात :५ ठिकाणी गार्डन व पार्क, १ ठिकाणी खेळाचे मैदान, १५

ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, ४ ठिकाणी दवाखाना व प्रसुती केंद्र,

१० ठिकाणी नगरपरिषद वापरासाठी जागा दुसऱ्या टप्प्यात :१६ ठिकाणी कचरा वर्गीकरण जागा, १४ ठिकाणी खेळाचे मैदान, ३ ठिकाणी बेगर लोकांच्यासाठी घर जागा, ८ ठिकाणी शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ९ ठिकाणी भाजीपाला बाजार तिसऱ्या टप्प्यात : ७ ठिकाणी गार्डन पार्क, २ ठिकाणी शाळा व ग्राउंड, २० ठिकाणी दफनभूम, १७ ठिकाणी कत्तलखाना चौथ्या टप्प्यात : १९ ठिकाणी, सांडपाणी निस्सारण प्रकल्प, १८ ठिकाणी मटन शॉप, फिश मार्केट, ६ ठिकाणी शॉपिंग सेंटर आणि पार्किंग, १३ ठिकाणी नगरपरिषद वापरासाठी जागा पाचव्या टप्प्यात :११ठिकाणी गार्डन व पार्क, २१ ठिकाणी खेळाचे मैदान, १२ ठिकाणी शाळा व ग्राउंड वरील मसुद्यानुसार पुढील दहा वर्षात शिरोळ शहरातील बहुतांश नागरिक, शेतकऱ्यांच्या जमिनी आरक्षित होण्याची भीती आहे. या खेरीज नगरपरिषदेला इतक्या मोठ्या प्रमाणात जमिनी आरक्षित करणे गरजेचे आहे का ? असा सवाल केला. शहरातील सर्वच नागरिकांनी आत्ताच एकजूट व एकसंघ होण्याची गरज आहे. तसेच भविष्यात आलेल्या आरक्षणाचे संकट थोपवण्यासाठी एकत्रीपणे लढा उभारण्याची गरज आहे. आरक्षण अन्यायाविरुद्ध मी शेतकऱ्यांच्या मागे ठाम उभा राहून शासन दरबारी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. असे आश्वासन पृथ्वीराजसिंह यादव यांनी सोमवारी पत्रकार बैठकीत दिले.

दरम्यान,नागरिकांच्या जमिनीवर रस्ते व इतर उपयुक्तीसाठी टाकलेल्या आरक्षणाच्या अनुषंगाने रविवारी कल्लेश्वर मंदिराच्या हॉलमध्ये पीडित शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रकाश माळी होते. या बैठकीत पृथ्वीराजसिंह यादव म्हणाले, आरक्षण टाकताना शेत जमिनीवर प्रामुख्याने रस्त्याचे आरक्षण टाकले आहे. यामध्ये भूमी संपादन किंमत म्हणून प्रति गुंठ्याला १७ हजार ७४० रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांना दर दिला आहे. याशिवाय शाळा, खेळाचे मैदान, बेघर, नगरपरिषद दवाखाना, बाग दफनभूमी यासाठी प्रति गुंठा १४ ते १५ हजार रुपये इतका मोबदला अहवालात नमूद केला आहे.बैठकीत शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले, यावेळी पीडित शेतकरी नागरिक कार्यकर्ते समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शिरोळ येथील आरक्षण ग्रस्त जमीन मालकांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना पृथ्वीराज जाधव**

# भोर मतदारसंघात लोकसभा निवडणुकीची तयारी पूर्ण

## ५६१ मतदान केंद्र... आचारसंहितेचे पालन करण्याचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांचे आवाहन

**भोर :** बारामती लोकसभा मतदार संघाअंतर्गत भोर, वेल्हे, मुळशी विधानसभा मदारसंघात लोकसभा निवडणुक मतदान ७ मे ला होणार असून पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक तयारी पूर्ण केली असून ५६१ मतदान केंद्रे तयार आहेत.भोर तालुक्याच्या अतिदुर्गम भागात असलेल्या बुरुडमाळ या मतदान केंद्रावर मतदारांची सर्वात कमी संख्या ४० तर मुळशी तालुक्यातील बावधन बुद्रुक येथील केंद्रावर सर्वाधिक १ हजार ४५४ मतदार संख्या असल्याची माहिती बारामती लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांनी दिली.

भोर शहरातील पंचायत समितीच्या सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांनी निवडणुकीविषयी आचारसंहिता, मतदान केंद्रे, मतदान कार्यपद्धती यासाठी प्रशासनाकडून झालेल्या तयारीची माहिती दिली. यावेळी भोरचे तहसीलदार सचिन पाटील उपस्थित होते.



पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक ५६१ मतदान केंद्रे ही भोर वेल्हे मुळशी मतदार संघात असून भोर तालुक्यात २४०, वेल्हे तालुक्यात ९५, आणि मुळशी तालुक्यात २२६ मतदान केंद्रांचा समावेश आहे.मतदार संघातील ९ गावात पाच पेक्षा जास्त मतदान केंद्रे आहेत.भोर तालुक्यातील रायरेश्वर येथील १६० मतदारसंख्या असलेले व सर्वात जास्त उंचीवर असलेले केंद्र ठरले आहे. भोर शहरातील छत्रपती शिवाजी विद्यालयातील मतदान केंद्र हे महीला संचालित राहणार आहे तर भोलावडे (ता.भोर) येथील मतदान केंद्र हे दिव्यांग कर्मचाऱ्यामार्फत करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच हिंजवडी (ता. मुळशी) येथील मतदान केंद्र हे युवा कर्मचारी संचालित असल्याचे कचरे यांनी सांगितले.

मतदान प्रक्रियेसाठी पोलीस वगळता २ हजार ८०५ कर्मचाऱ्यांसह ७० क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आचार संहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी १५ भरारी पथके २४ तास कार्यरत ठेवण्यात आली आहेत. याशिवाय १२ एप्रिल पासुन १२ स्थिर तपासणी पथकेही सुरु करण्यात येणार आहे. आचार संहिता दरम्यान होणाऱ्या सभा आणि इतर बाबींसाठी छायाचित्रीकरण आणि छायाचित्रीकरण तपासणी पथकेही कार्यरत ठेवली आहेत. सार्वजानिक व शासकीय ठिकाणचे बोर्ड हटविण्यात आले असून खाजगी ठिकाणी लावलेले बोर्डही कढण्यात येणार आहेत. सभेसाठी परवानगी घेण्यासाठी एक खिडकी योजनाही कार्यान्वित केली आहे.८एप्रिल पर्यंत मतदार यादीत नाव नोंदविणाऱ्या नवीन मतदारांना या निवडणूकीत मतदान करता येणार आहे. त्यामुळे ८ एप्रिलला नोंदणी झालेल्या मतदारांची संख्या ग्राह्य धरली जाणार आहे.

### ४० मतदारांसाठी नवीन केंद्राची सोय..

**भोर तालुक्यातील भाटघर धरण खोऱ्यातील अतिदुर्गम भागात सांगवी वेखो ग्रामपंचयती अंतर्गत येणाऱ्या बुरुडमाळ येथील २० महीला व २० पुरुष अशा ४० मतदारांसाठी नवीन मतदान केंद्र सुरु करण्यात आले आहे. यामुळे बुरुडमाळच्या ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.कारण यापूर्वी मतदानासाठी त्यांना भाटघर धरणाच्या पाण्यातून होडी मधून प्रवास करुण मतदानाला जावे लागत होते.**

### तालुका निहाय गावांची स्त्री पुरुष मतदारांची व केंद्रांची संख्या....

| वेल्हे तालुका | भोर तालुका | मुळशी तालुका |
|---|---|---|
| गावांची संख्या - १३० | गावांची संख्या - २०० | गावांची संख्या - १४७ |
| मतदान केंद्रांची संख्या - ९५ | मतदान केंद्रांची संख्या - २४० | मतदान केंद्रांची संख्या - २२६ |
| पुरुष मतदार - २७१४१ | पुरुष मतदार - ८२०६३ | पुरुष मतदार - १०२२४१ |
| महिला मतदार - २४४६७ | महिला मतदार - ७९०२३ | महिला मतदार - ८२९०५ |
| तृतीयपंथी मतदार - १ | तृतीयपंथी मतदार - १ | तृतीयपंथी मतदार - ३ |
| एकूण मतदार - ५१६०९ | एकूण मतदार - १६१०८७ | एकूण मतदार - १८५१४९ |